आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
६ जानेवारी २०२५ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विद्यार्थ्यांना परीक्षेशी संबंधित ताणतणाव हाताळायला मदत व्हावी यासाठी सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचा समुपदेशन सेवा सुरू करण्याचा निर्णय

- केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते आज सीएसआर परिषदेचं उद्घाटन

- माजी केंद्रीय मंत्री सुरेश कलमाडी यांच्या पार्थिवावर आज पुण्यात अंत्यसंस्कार होणार

- व्हेनेझुएलाचे माजी अध्यक्ष निकोलस मादुरो यांनी अमेरिकेच्या कारवाईला दिलं आव्हान/ हंगामी राष्ट्राध्यक्ष म्हणून डेल्सी रॉड्रीग्ज यांनी काल पदभार स्वीकारला.

**आणि**

- मलेशिया खुल्या सुपर 750 बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या लक्ष्य सेनचा पुरुष एकेरीच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश

**<><><><><>**

विद्यार्थ्यांना परीक्षेशी संबंधित ताणतणाव हाताळण्यास मदत व्हावी यासाठी सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने समुपदेशन सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. यावर्षी या सेवेचा पहिला टप्पा १७ फेब्रुवारी ते १ जूनपर्यंत राबवला जाणार आहे. विद्यार्थ्यांना परीक्षेशी संबंधित ताणतणाव, वेळेचं व्यवस्थापन तसंच इतर भावनिक तणावांना सामोरं जाता यावं यासाठी त्यांना मार्गदर्शन करणं हा या उपक्रमाचा हेतू आहे. १ ८ ० ० १ १ ८ ० ० ४ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून विद्यार्थी मदत मिळवू शकतात. याद्वारे प्राचार्य, शिक्षक, समुपदेशक, तसंच मानसोपचार तज्ज्ञांचं मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळणार आहे. यातले ६१ समुपदेशक हे भारतातले तर बारा जण नेपाळ, संयुक्त अरब अमिराती, जपान आणि कतारमधले आहेत.

**<><><><><>**

नवी दिल्लीतल्या विज्ञान भवनात सीएसआर परिषदेचं उद्घाटन आज केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते होणार आहे. 'पोषण सुरक्षा आणि कुपोषण निवारणामध्ये सामाजिक उत्तरदायित्व निधीची भूमिका' या विषयावरच्या या परिषदेत

मुलांमधल्या कुपोषणाचा सामना करण्यासाठी सहयोगी, नाविन्यपूर्ण आणि शाश्वत धोरणांवर विचारमंथन होणार आहे. राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळानं या परिषदेचं आयोजन केलं आहे. या परिषदेदरम्यान अमित शाह यांच्या हस्ते शिशु संजीवनी उपक्रमाचं उद्घाटन करण्यात येणार असून त्याद्वारे महाराष्ट्रात नागपूर जिल्ह्यातल्या अंगणवाडी केंद्रांमध्ये शिकणाऱ्या सुमारे तीन हजार मुलांना पौष्टिक आहार प्रदान करण्यात येणार आहे.

**<><><><><>**

देशात व्यवसाय करणं सुलभ कसं होईल याकडे गेल्या अकरा वर्षांत केंद्र सरकारने लक्ष केंद्रित केलं. विविध अडथळ्यांच्या शर्यतीतून वाट काढत देशात व्यवसायाला अनुकूल वातावरण तयार करण्यात आलं. १९९१ हे आर्थिक सुधारणांचं वर्ष समजलं जातं तसं २०२५ हे नियंत्रणमुक्तीचं वर्ष ठरलं आहे, याविषयी अधिक माहिती घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून....

-----व्हीसी------

*(वाढीसाठी प्रतिकूल कायदे आणि कठोर नियमांमुळे भारतीय कंपन्यांची वाढ वर्षानुवर्षं खुंटलेली होती. कंपनीचा विस्तार करण्यात छाननी, विविध निर्बंध आणि कामगार कायद्याच्या अडचणी होत्या. हे अडथळे २०२५ मधे केंद्र सरकारच्या धोरणांमुळे दूर झाले. केंद्र सरकारने छोट्या कंपन्यांसाठी उलाढालीची मर्यादा दहापट वाढवून शंभर कोटी करून वाढीतला पहिला अडथळा दूर केला. गुंतागुंतीचे कामगार कायदे रद्द करून त्याचं सुटसुटीत चार श्रम संहितांमधे रुपांतर करण्यात आलं. त्यामुळे या कायद्यांमधे स्पष्टता आणि पारदर्शकता आली. त्यामुळे कंपन्यांच्या वाढीसाठी खुलं वातावरण उपलब्ध झाली.*
*जाचक निर्बंधामुळे देशाच्या उत्पादनावरही परिणाम होत होता. तसंच निर्यातदेखील मंदावली होती. यामुळे सरकारने ७६ उत्पादनांना नियमनमुक्त केलं, याशिवाय २०० अतिरिक्त उत्पादनांवरचं नियंत्रणही काढून टाकलं. नियंत्रणमुक्तीची प्रक्रिया सरकारने अधिक वेगाने राबवली. त्यामुळे देशातल्या उत्पादन आणि निर्यातीवर याचा सकारात्मक परिणाम झाला. रिझर्व्ह बँक आणि सेबीने सुद्धा नियंत्रणमुक्तीचं धोरण राबवलं. त्यामुळे गुंतवणुकदारांसाठी प्रक्रिया अधिक सुलभ झाली.)*

**<><><><><>**

आंध्रप्रदेशमध्ये कोनासीमा जिल्ह्यात ONGC च्या तेल विहिरीतून  झालेल्या गॅस गळतीनंतर लागलेली आग आटोक्यात आणण्यासाठी आज ONGC  च्या तज्ज्ञांचं पथक मुंबई आणि दिल्ली इथून रवाना झालं. मोरी आणि इरुसुमांडा या गावांजवळच्या या तेल विहिरीतून काल गॅस गळती झाली. त्यानंतर  जवळजवळ २० मीटर उंच आणि २५ मीटर रुंदीचा आगीचा झोत उसळला.

आग विझवण्याचा प्रयत्न युद्ध पातळीवर सुरु असून, अग्निशमन दल, पोलीस दल, ओएनजीसी, राज्य आपत्ती प्रतिसाद दल आणि रेडक्रॉस चे कर्मचारी कालपासून या ठिकाणी कार्यरत असल्याची माहिती कोनासीमाचे सह जिल्हाधिकारी टी निसंथी यांनी पीटीआय या  वृत्तसंस्थेला दिली.

<><><><><>

माजी केंद्रीय मंत्री  सुरेश कलमाडी यांच्या पार्थिवावर आज पुण्यात अंतिम संस्कार होणार आहेत. आज पहाटे त्यांचं निधन झालं. ते  ८२ वर्षांचे होते. भारतीय हवाई दलात वैमानिक म्हणून सेवा बजावताना त्यांनी १९६५ आणि १९७१ च्या युद्धात प्रत्यक्ष भाग घेतला होता. निवृत्तीनंतर ते राजकारणात सक्रीय झाले. १९८२ ते १९९६ अशी सलग १४ वर्षं, आणि नंतर १९९८ ते २००४ या कालावधीत ते राज्यसभेचे सदस्य होते. १९९६ मधे लोकसभेत निवडून गेले होते. काँग्रेसच्या सत्ताकाळात त्यांनी रेल्वे खात्याचं मंत्रीपद सांभाळलं. ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्षही होते. राष्ट्रकुल स्पर्धांच्या आयोजनात भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने त्यांच्या राजकीय कारकिर्दीला धक्का बसला होता. गेल्या वर्षी सक्तवसुली संचालनालयाने दिलेल्या अहवालानंतर त्यांची आरोपातून मुक्तता झाली होती.

पुणे शहराच्या सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्राला नवी दिशा देण्यात कलमाडी यांचा मोलाचा वाटा होता. पुणे फेस्टिव्हल आणि पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनसारख्या उपक्रमांची सुरुवात करून त्यांनी पुण्याला राष्ट्रीय स्तरावर वेगळी ओळख मिळवून दिली.

कलमाडी यांच्या निधनाबद्दल ज्येष्ठ नेते शरद पवार तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><><>

व्हेनेझुएलाचे नेते निकोलस मादुरो यांनी अमेरिकेनं आपल्यावर  ठेवलेले आरोप फेटाळले असून, आपल्या अटकेच्या वैधतेवर प्रश्न उपस्थित केला आहे. अमेरिकेनं लष्करी

कारवाई दरम्यान, गेल्या शनिवारी त्यांना अटक केली. त्यानंतर काल त्यांना न्यूयॉर्क इथल्या न्यायालयात पहिल्यांदाच हजर करण्यात आलं. मादुरो यांची  अटक, हे लष्करी अपहरण असल्याचा युक्तिवाद त्यांच्या वकिलांनी केला असून, अमेरिकेनं परदेशी भूमीवर केलेली ही कारवाई आंतरराष्ट्रीय कायदा आणि प्रक्रियेचं उल्लंघन करणारी असल्याचं म्हटलं आहे.

<><><><>

व्हेनेझुएलाच्या हंगामी राष्ट्राध्यक्ष म्हणून डेल्सी रॉड्रीग्ज यांनी काल पदभार स्वीकारला. नॅशलन ऍसेम्ब्लीचे नेते आणि डेल्सी यांचे बंधू जॉर्ज रॉड्रीग्ज यांनी त्यांना पदाची शपथ दिली. डेल्सी यांनी निकोलस मादुरो यांच्या बरोबर  उपराष्ट्राध्यक्ष म्हणून काम केलं. तसंच २०१४ ते २०१७ दरम्यान त्या व्हेनेझुएलाच्या परराष्ट्र व्यवहार मंत्री होत्या.

<><><><>

निकोलस मादुरो यांच्या संबंधित स्वित्झर्लंडमधील मालमत्ता गोठवण्याचे आदेश स्वित्झर्लंडने दिले आहेत. या मालमत्ता अवैध मार्गानं मिळवलेली असून या मालमत्ता स्थानिक नागरिकांच्या कल्याणासाठी वापरण्यात येतील, असं स्वित्झर्लंड सरकारनं म्हटलं आहे.

<><><><>

जगभरातल्या देशांवर लावलेल्या आयात शुल्कामुळे अमेरिकेला ६०० अब्ज डॉलर्स पेक्षा जास्त महसूल मिळणार असल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. या धोरणामुळे अमेरिकेची आर्थिक स्थिती सुधारली असून, राष्ट्रीय सुरक्षा अधिक मजबूत झाल्याचं त्यांनी समाज माध्यमावरच्या  पोस्टमध्ये म्हटलं आहे.

अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्र दुसऱ्यांदा स्वीकारल्यावर ट्रम्प यांनी राष्ट्रीय सुरक्षा आणि परराष्ट्र धोरणाचं प्रमुख साधन म्हणून आयात शुल्काचा वापर केला असून, भारतासह जगभरातल्या अनेक देशांकडून होणाऱ्या आयातीवर मोठ्या प्रमाणात शुल्क लादलं आहे.

<><><><>

रशियाबरोबर युद्धविराम झाल्यानंतर युक्रेनची सुरक्षाव्यवस्था कशी असेल, याबद्दल चर्चा करण्यासाठी युक्रेनच्या मित्रदेशांची बैठक आज पॅरिस इथं होणार आहे. मात्र, अमेरिकेचे

अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या सरकारचं लक्ष्य व्हेनेझुएलावर केंद्रित झाल्यामुळे या बैठकीत किती प्रगती होईल, याबद्दल शंका व्यक्त केली जात आहे.

<><><><><>

क्वालालाम्पूर इथं सुरू असलेल्या मलेशिया खुल्या सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेत सिंगापूरच्या जिया हेंग जेसन तेह याचा पराभव करत भारताच्या लक्ष्य सेनने पुरुष एकेरीच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. या सामन्यात लक्ष्य सेनने जिया हेंग जेसन तेह याचा २१-१६, १५-२१, २१-१४ असा पराभव केला. दुसऱ्या फेरीत त्याचा सामना फ्रान्सच्या क्रिस्टो पोपोव किंवा हाँगकाँगच्या ली चेउक यीऊ याच्याशी होईल.

दरम्यान, महिला एकेरी स्पर्धेत भारताच्या मालविका बनसोड हिला थायलंडच्या खेळाडूकडून ११-२१, ११-२१ असा पराभव स्वीकारावा लागला. आज आयुष शेट्टी याचा सामना मलेशियाच्या खेळाडूशी तर पुरुष दुहेरीत एम आर अर्जुन आणि हरीहरण अमसकरूनन यांचा सामना जपानच्या खेळाडूंशी होणार आहे.

<><><><><>

येत्या १८ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेच्या बक्षिसाच्या रकमेत वाढ करण्यात आल्याचं स्पर्धेच्या आयोजकांनी आज घोषित केलं. त्यानुसार २०२६ च्या हंगामातल्या पहिल्याच स्पर्धेत बक्षिसाची रक्कम ११ कोटी १५ लाख ऑस्ट्रेलियन डॉलर्स इतकी असेल. पात्रता स्पर्धेच्या बक्षिस रकमेत १६% वाढ होईल, तसंच सर्व प्रमुख एकेरी आणि दुहेरी सामन्यांच्या खेळाडूंना मिळणाऱ्या बक्षिसाच्या रकमेत कमीतकमी १० टक्के वाढ होईल, असं यात म्हटलं आहे.

<><><><><>

१९ वर्षांखालील क्रिकेटमध्ये दक्षिण अफ्रिकेत काल झालेल्या सामन्यात इथं सुरू असलेल्या तीन सामन्यांच्या मालिकेत दुसऱ्या सामन्यात भारताने यजमान दक्षिण अफ्रिकेचा ८ गडी राखून पराभव केला. या विजयासह भारताने ही मालिका जिंकली आहे. डकवर्थ लुईस नियमानुसार भारताला १७४ धावांचं सुधारित लक्ष्य मिळालं होतं. भारताने दोन गडी गमावून ते पार केले.

//<><><><><>//